त्यांच्या सेवेत ओततो प्राण,
वैभव आणि हे बहुमोल क्षण
आयुष्याचे,
फोल वाटते ना,
हे सारे तत्वज्ञान ?
वाटायचेच
ते वाटणे मात्र तुझे नाही.
तुला जे प्रिय, श्रेय, अभिप्रेत
वाटते-
ते तर त्या जडाशी मैत्री केल्याचे
परिणाम-
जगाला वश करु,
चिंकून टाकू त्याला,
कधी सेवेने,
कधी संयम-त्याग-दानाने,
तर कधी
तलवारीच्या धाकाने.
काय साधले त्याने ?
आजवर
झाले अनेक रणशूर, रणमर्द
चक्रवर्ती, राजे-सम्राट-
आज त्यांना कुणी विचारीतही नाही.
मग, कधी तरी
मनाच्या शांत शांत कोपऱ्यात
विसावलेल्या आत्म्याच्या

प्रश्नाला सामोर,
निर्भयपणे, जात का नाहीस ?
कशासाठी हा सारा अट्टाहास ?
दिग्-दिगंत जिंकणाऱ्या
त्या मानवाची जराजर्जर
अवस्था-
पाहा तरी एकदा-
विचार मग मनाला,
हे चालले आहे तरी काय ?
लाखांचा पोशिंदा असल्याचा
तुझा अभिमान-
कोटी कोटी जनतेवर अधिराज्य
करण्याचा आनंद-
त्या आसुरी आनंदांत
तू तृप्त तरी आहेस का?
त्या अभिमानाचा अग्नी
कधी तरी शांत-
अग्नी तर आहुती मागतच जाते-
क्रोधादि विकार, त्या वासना
देखील तशाच.
सारा खेळ,
तुझ्या मानसीचा
वाऱ्यावर उडून जाती
जशी पिवळी पाने,
तशीच तुझी ही शोकांतिका.
या मातीत तुझीच

अनंत जनमीची कलेवरे,
या वाऱ्यात
तुझे अनंतानंत उच्छ्वास
ही जी वनराजी,
लता, वृक्ष सरोवरे
हे चंद., तारे
अनेक ग्रह गोल-
सारे तुझे, जन्मोजन्मी उपभोगिलेली
शरीरे-
त्या नाशवंत शरीरांची
सभोवताली केवळ राशी.
जे त्यागिले,
ते भोगण्याची किती लालसा.
ती लालसा, ते हवे-नको,
ती अभीप्सा-
सारे सारे उपयुक्त-
त्याच त्याच वासनांच्या,
वासनांच्या गराड्यात
तुला वाटते ना सुख ?
त्या सुखाची जात
तपासून तरी पहा.
ती वासना, तो अहंकार
तो क्रोध, तो लोभ
ही सारी पाप-बीजे,
ती परत परत पेरुन
तू स्वत: धन्य.

त्या वासना वात-चक्रात

सापडून

तू करुन घेतलीस अवस्था.

कुठेही नावीन्य नाही,

चैतन्योर्मी नाही,

ज्ञानाची प्रखर तेजस्विता

पण नाही.

: ४० :

ज्या कर्मात, कार्यात, अनुष्ठानांत

तपात, संयमांत, कायक्लेशात

ज्ञान नाही,

आत्मप्रीती नाही,

स्व-संवेदनता नाही,

ते कम्र, कर्म तरी कसे ?

ज्या कोकिळेच्या कंठातून

कुहु कूहु स्वर येत नाहीत,

ती कोकिळा कशी ?

ज्या मलयानिलाने

ताप दूर होत नाही,

तो लमय पवन कसा ?

श्रेष्ठ कर्म; श्रेष्ठ क्रिया

नित्य ज्ञान-लक्षी-

नित्य ज्ञान-प्रकाशाकडे

तिचे नेत्र.

ज्ञान, आत्मज्ञान, चेतनेर्जा
हाच तर त्या सर्व
कार्याचा आत्मा.
तीच आत्मा, ज्ञानगुण संपन्नात्माच
या साऱ्या निसर्गात सामावून आहे-
तोच आत्मा-
सत् कर्म असो वा दुष्कर्म
त्यात ज्ञानमय ऊर्जा नसेल
तर ते सारे कर्म
त्या साऱ्या पूज-प्रार्थना-वंदना
व्यर्थ.
कर्म-विनाश
म्हणजे तरी काय ?
कर्मात ज्ञानाग्नीचा प्रवेश.
गवतावर अग्नी पडावा तसा
जाहण्याची क्रिया घडते-
घडवावी लागत नाही-
ज्ञान ऊर्जेने सारे कर्म
असेच भस्मी भूत-
अग्नि-दग्ध दोरखंड
बांधू शकत नाही,
तसेच,
ज्ञानदग्ध कर्मे
जीवात्म्याला बांधू शकत नहीत.
हजारो वर्षे वाहाते एखादी नदी,
पण ज्ञान जाणते-

यातून विद्युत् वाहाते आहे,
त्या विद्युत् शक्तीचे ज्ञान
होताच, लखाखती
लक्ष लक्ष दीप-
ज्ञान होताच,
कर्म परमाणंचा गराडा
नष्ट होऊन जातो,
राहाते केवळ स्मृती-
अनशन, अवमोदर्यादिक
उपवास-तपांनी,
कितीही कष्टविले त्या शरीरा-
अन्न-पाण्याशिवाय,
जरी तू राहिला दशवर्षे
तरी ते सारे तप, जप अनुष्ठान
केवळ क्लेश शरीराचे
शरीर त्या तपांनाही
पचवून उरतेच-
शरीराने असे काय
पाप केले ?
त्याचा छळ कशासाठी-
जर जड-जीवाचा
भेदच कळाला नाही तर.

: ४१ :

ज्ञान-शक्ती,
परम-चैतन्य शक्ती,

तिच्या पूजेत, तिच्या वंदनेत
सारे कर्म-नैष्कर्म्य-
ते अढळपद ज्ञान शक्ति पीठाचे
त्या पदीं जो स्थिर
तोच,
सहज-बोध कलेचा स्वामी.
स्वामी त्या ज्ञान-हक्‌तीतीचा.
त्या पदीच
रमांवे, संतोषावे
नित्य,
तया पदीच घडतो
साक्षात्कार जीवन-सर्वस्वाचा.
तीच खरी तृप्ती
जेथ आस नाही कशाची.
मनी निर्णय असा,
की मी सर्वस्वी ज्ञानमय
आदि अंती आणि सर्व आत्मप्रदेशात-
तोच निर्णय खरा.
नित्य, शाश्वत,
मांगल्यपूर्ण-
वाचेला अगोचर
मनालाही अगोचर
केवळ त्याच पदात
घडतो साक्षात्‌कार
जीवन-मुक्ततेचा.
तेथे मसती

पथ, मार्ग, भेदाभेद.
उच्च-नीचता
अमगल वासनांचे खेळ.
केवळ दंभ.

: ४२ :

हे ज्ञानमूर्ती आत्म्या !
अचिंत्य शक्तिमान तू,
खरोखरीचा चैतन्य-चितामणि-
त्या चिंतामणी रत्नाचा
तू स्वामी-
मग तुला काय उणे,
काय दुणे ?
अन्याचे ऐश्वर्य, संपत्ती, भोग
त्याचे तुला काय ?
जे दुसऱ्याचे, ते दुसऱ्याचेच,
तुझ्या ज्ञानसामर्थ्याहून जे
अन्य ते दुसऱ्याचे-
तुझे नाही.
आणि कोणताही शहाणा-
दुसऱ्यांचे द्रव्य,
दुसऱ्यांचे गुण
दुसऱ्यांचे परिवर्तन
स्वत:चे मानीत नाही-
कसे मानेल ?
ते तर चौर्यच.

पर-द्रव्याला स्पर्श
त्याला वाटतो पाप-स्पर्श-
पर-द्रव्याच्या गुणांतील आसक्ती
ते तर हलाहल प्राशन-
केवळ तू,
ज्ञान-दर्शन-चारित्र्यमय तू
तुझाच स्वामी-
सर्व-विकार-विचार-वासना
हे सारे परस्पर्शित, परधार्जिणे
त्यातून तू सर्वस्वी
वेगळा.

: ४३ :

म्हणशील, हा देह माझा,
नर तू देहच होऊन जाशील.
जर म्हणशील ही पृथ्वीच माझी
तर तू पृथ्वीच होऊन जाशील.
हे जे मी-पण वा माणे-पण
ते सारे स्वप्न-रुप.
पाहता लोचनी आत्मरुप
गोजिरे, साजिरे
प्रकाशमय
तर उरणारच नाही
ही ममता, अहंकारिता-
सारे येथेच पडून
राहातात,

ती स्वप्ने, त्या आकांशा-

तू देहधारी तर खराच,

पण देही नाही - तू विदेही

पाहिले नाही कां

ते देह, मृत, छिन्न विचछिन्न

जे अपघाती सापडले-

जे जराजर्जर, कर्करोग युक्त

दुर्गधमय, सडलेले-

त्या देहमयतेत तू नाहीस,

देह एक साधन

त्या देहाचा तू विश्वस्त,

त्याचा तू परमसाक्षी,

त्याला निश्चल, निष्कंप

करुन,

तू धयन-समाधीने

घेऊ शकतोस दर्शन

त्या परमात्म-स्वरुपाचे.

: ४४ :

उठतात जे विकल्प,

तुझ्या हृद-सरोवरात,

ते कपळे होत नाही,

होतात बुडबुडे,

ते सारे संकल्प-विकल्प,

त्यांच्या गराड्यात,

वाटते तुला कर्तृत्व,

तो विकल्प हेच कर्म,
आणि तू होऊन जातो
त्याचा कर्ता-
होता येते का स्वार-
वाऱ्याच्या घोड्यावर-
बांधता येतात का
हवाई-इमले-सुस्थिर,
तसेच तुझ्या
मनातील हे संकल्प-विकल्प
जेथे कांही करण्याचा संकल्प
तेथे तू होऊन जातो
कर्ता,
जेथे केवळ ज्ञायक भाव-
वा जाणण्या-नेप्पण्याचा भाव
तेथे केवळ ज्ञान-
जो जाणतो,
तो कांही करत नाही,
जो करतो,
तो जाणत नाही-
क्रिया कांही जाणे ना,
ती केवळ घडते,
त्या क्रिया-अक्रियांचा
ज्ञाता, केवळ ज्ञान-
ज्ञानच क्रिया, सर्वांगी
भरुन राहे-
जैसे मृद्रुतव नवनीताचे

घडतात क्रिया,
त्यांचा साखळ्याच-
परि त्या क्रियांत,
कर्ता नसे,
कर्ता असे,
केवळ ज्ञाता
कर्ता करु ना शके कर्म
पाहाता सूक्ष्मपणें-
कुंभकार करी मडके
पण तो मडकयाहुन वेगळा,
क्रोध करशी जरी तू,
त्या क्रोधाहूनी तू वेगळा.
वासना अन् विकार
यांच्या मध्ये राहूनही
तू ज्ञान-बळे,
वेगळा,
यथार्थत्वे आणता आत्मा,
तो न गुंते क्रिया-कर्मी
घडती क्रिया अनवरत
परि हा नसे त्यात रत.
हे जे भिन्नत्व,
ते पाहता सुनिर्मळ
ज्ञानमय रुप त्याचे
जाणव.

ज्ञानी जनाचे कार्य,
हे केवळ ज्ञानयम,
त्या कार्याशी
तो कधीही
एकरुप नसे.
ही अनात्म संबंधाची
गाथा-
अनेक भवभंवांतराची कथ
त्या कथंपासून
तो निश्चये वेगळा.
परत्वी ही जी रती
ती-काम-बंध-भोगांची
साखळी.
ज्यात बध्द हा जीवात्मा
सुख-दु:खी व्याकुळ.

: ४६ :

अन्य वस्तूभूत ही मोहांधता,
जन्म दे अज्ञान-कालुष्यता,
आणि असंयमरुपता,
असे त्रिविध ताप
जीवा, छळती सदा
जरी आत्मा नित्य
शुध्द, निरंजन, मुक्त
परि त्रिविध तापे तप्त,
त्यामुळे संसार

विविध रुपे.

धारण करी अज्ञानांचे सोंग

होई प्रमत्त मोहासवे,

त्यामुळे घडे संसार

अनादिचा.

: ४७ :

जी रती, जो स्वाद

जी रुची

त्यातून तुझे वेगळेपण-

त्या वेगळेपणाची जाण

जागृत करते-आत्म्या प्रीती.

असा वाहवत जाऊ नकोस,

तो प्रवाह आहे-

अंतर्गत वेदना-संवेदनेचा,

क्रोधादि विकार-वासनांचा,

त्या प्रवाहातही

त वेगळा.

पोहणारा नदी होऊन जात नाही,

पाणी होऊन जात नाही,

तो तया जल प्रवाहून

जाणतो स्वतःला

वेगळा.

म्हणूनच तर तो

पार करु शकतो नदी.

तुझ्या पोहोण्याची क्रिया,

नदीची होत नाही, वा पाण्याची ही.
दोनही स्व-रेस िभिन्न,
तैसा आत्मा राहे
ज्ञान गुणे,
न रंगे कुणाही संगे
नित्य स्सिंग त्याचे रुप.
तोचि जिन ...
परमात्माही तोचि
जोन रंगे पररुपी.
हे केवळ जाणवे
अनुभवात्मका-
अनुभव सर्व समर्थ
वचन त्याचे सार्थ

: ४८ :

सर्व कर्माचा अकर्ता
सर्व पुण्य-पाप-फलांचा अ-भोक्ता.
वीतरागता हाच धर्म
नित्य जाणवे सर्व काळ;
कर्म फळांच्या उदयकाळी,
न म्हणे हे स्वादु-वा अस्वादु
केवळ ज्ञाता होऊन राही.
तो ज्ञानमय परमात्मा
सर्व जीवात्म्यांत सारखा
न म्हणे मी क्रोधी, मी अहंकारी,
मी श्रीमंत, मी गरीब,

मी राजा वा रक

त्या सर्व स्थितीत

तो स्थित प्रज्ञ.

जडाजडांच ठायी

त्याची नसे ममत्व बुध्दी

देही बैसला परमात्म राजा

नित्य त्योच ध्यान.

जे घडते ते घडून जाते,

वारा, वादळ जैसे निघून जाते

तैसा राही स्थिर

आत्म-स्वरुपी.

जैसा वैद्य राही स्थिरबुध्दी

शल्य-कर्मी चातुर्य करी,

परी ना ममतव त्या देही

जो आर्ताला असे.

आणतो रोगादिकांना

उपचारे करी बरा त्याला,

परि त्यात ना गुंते.

तैसा आत्मा, ज्ञानगुणे

केवळ जाणी स्व-पररुपा

परि नित्य सावधान स्व-रुपे.

असा ज्ञानी जरी स्व-चिंतनी

तरी तो व्यवहार ना सोडी.

शोक समयी शोक करी,

होता सम्राट जग जिंकी,

सहस्त्रावधि शत्रूसंगे

युध्द करी-

परी आत्मरती ना सोडे.

जाणे स्वत:ला अकर्म-बध्द

निरासक्त व उदासीन

त्या चिती परत्व न प्रवेशे.

: ४९ :

मी जरी अ-ज्ञानी

अल्प स्वल्प जाणे जरी,

तरो मी न स्पर्शे, न स्वादे

त्या पर पदार्थांना.

शुभ असो वा अशुभ कर्म

त्या कम्ा्रंचा मी न कर्ता,

न भोक्ताा्,

जरी म्हणे मी भोवता वा कर्ता

ते जरी वाटे यथार्थ,

तरी ते से नसे.

स्व-पराचे जे एकत्व

अनुभवा येते

ते अज्ञानमय सारे

कारण-

विज्ञान-धन आत्मा

न सोंडी अपुल्या

दिव्य स्वादा त्रिकाळी

दूध, दही जैसे

एका दुधाने व्यापिले असे

तैसे ज्ञानी पाही, जाणे

अनुभवे केवळ स्व-स्वरुप

ज्ञान स्वरुपाचा एक गुण,

तो स्पर्शे सर्व वससतुजात

आकळे सर्व ब्रह्मांड

तरी तद्‌रुप न होई

सूर्याची किरणे,

विश्वाला आकळे स्व-बळे,

परि संध्याकाळ होताच,

तो आवरुन घेई

सर्व किरणे,

पुन: सर्व पदार्थ जिथलया

तेथे.

हा जो व्याप्य-व्यापकपणा

तो जाणून घेता पूर्ण,

आकळे आत्मरुप.

ज्ञानी असो वा अज्ञानी,

वस्तु-गुणांची अदला-बदल

घेडेच ना.

ज्ञान राही, ज्ञान केवळ,

पररुप, मोजणी स्व-बळे,

परि तो न परिणमे

पररुप, त्रिकाळी

: ५० :

जे जे पदार्थ,

जड या चैतन्युक्त,

ते ते स्वत-गुणीच

राहतो.

जडाचे गुण,

न होती चेतनेचे

चेतनेचे गुणही

न त्यागी स्वत-द्रव्य

जरी दिसती त्यांची संयुगे,

एकमेका आकळुनी

कंठती काळ किती तरी-

परी गुणसंकर ना सींावे,

शर्करा-धृत जरी मिसळले

तरी शर्करा न होई

घृत रुप

तैसेच जीवात्मा

संग करी परद्रव्याचा

तरी तो मळे त्यांच्या सवे.

जड-अजउांचा हा खेळ

चालल असे अनादिकाळ

परि ते एकरुप

होती ना.

जरी लिंपली भिंत

विविध रंगे-

परि भत अलिप्त

त्या रंगाहूनी.

सारे रंग असे,

कधी तरी उडून जात

अन् मूळ भिंत,

दृग्गोचर.

पाहाता जीवाचे विविध विकार

जड-परमाणू त्या निमित्ते

घेती विविध आकार, रंग, रुप.

जीवात्मा ही त्यांचया सवे

रंग खेळतो अनेक

परि तो न होई तद्‌रुप,

कधीही.

जैसे खेळामध्ये

दोन पक्ष,

परस्पर मिळती, जुळती,

परि

त्यांचे द्वैत

ना संपे.

: ५१ :

करुनी एकमेका निमित्त,

नित्य चालली त्यांची खेळी

परि कुणी-कुणाचे

कर्तृत्व नां घे.

अशी कर्म-कर्तृत्वी उदासीनता

पाहुनी जो न रमे

त्या खेळी,

तो ज्ञानी.

त्या ज्ञानियाच्या विवेकी,
सारे परिवर्तन
नाम मात्र,
त्या परिवर्तनी
नाश न होई स्वभावाचा
अनेकानेक वैचित्र्यी
एकरुप गुण-स्वभाव;
जन नांव देती अनेक,
तयांची लक्षणे सांगती भिन्न
अन् विविध कांळी,
भिन्न भिन्न प्रयोजन,
तरी आत्म-तत्त्व बदलेना!
जरी कम्र प्रवाही चेतना वाहे,
वा चेतनेसंगे कर्मप्रवाह
तरी ते नित्य भिन्न
स्वभाव-रुपे.

: ५२ :

हृदय-कमली
समय-चैतन्य वाहे,
त्या चैतन्य-रसी
तोपरमातमाच आहे,
अशी जयाची ठाम मती
तो होई आत्म-रती.
पर-भावात्मक शून्यता
ही केवळ नव्हे ाावना

ती तर आक्षात्

द्रव्यरुप अवस्थी

चराचरी जे रुप विलसे

आनंदोल्हासे जग सजले

त्या सर्वाठायी चैतन्यराजा

विविध रुपे, स्व-बळे

समथ ऐसा हा महा प्रतापी,

चैतन्य ते जे ढवळी जगासी

आनंद-यात्री, एक-रस-स्वभावी

त्यासी नसे बंधन कांही लागी.

सुनिर्भर, स्वानुभवरसानुकूल

अपार-बोधामृत-सागर-रुप.

सामर्थ्य त्याचे,

जे ग्रासते विश्व-त्रिलोक

चैतन्य धातू असाच दिव्य

व्यापून राही जीवात साऱ्या

वैचित्र्य वाटे पाहून त्याला,

व्यापून राही जडाजडाला.

असा जो चैतन्य राजा,

तो पांधरतो

कांबळी-आवरण-स्वरुपाच्या.

त्या आवरणाच्या आंत

दडून असते, त्याचे

अनंतात्मक स्वरुप.

जसे सूर्याकडे पाहणे

जमे ना, प्रकाश प्राकट्यामुळे

तसे त्याचे अनंतत्व
आकळेना स्फुट-रुपे
अखंड-दर्शन- ज्ञान-स्वाभावे
प्रागल्भ्य ज्याचे
नित्य प्रवाही,
जो प्रतिस्वमयी
नित्य विलास-विभूतीमत्वी,
लावण्य प्रगटे
जैसे मेघतून सूर्य ये वरती
व्यापून टाकी सर्व-त्रिलोक.

: ५३ :

ज्ञान असे मोक्ष हतू,
त्या हेतु अभावी
सारे शून्य-अर्थ, क्रिया शून्य,
पुण्य-भाव,
न करु शके बंधा पलिकडे.
पुण्य-सुर्णाच्या बेड्या
जरी नेत्र सुखावती
पाहून ते सुवर्ण-
परि मुक्ती घडेना.
भिंती जरी रत्नजडित
कारागृहाच्या,
जरी सर्व भौतिक सुखे
हात जोडोनी,
तरी मुक्ती-संभव नसे.

अनुपम, अचल, सुस्थिर
तो आत्मा-
ज्ञानमय आणता स्वत:ला
आणि उद्रुप तो परिणमे-
शील-व्रत, उपवास, नियम-संयम
शोभती ज्ञानासवे.
परमार्थाच्या मंदिराबाहेर
जे उभे,
ते चाहती पुण्य लाभ
पुण्य-रथ धावतो वेगे
जेथे चैतन्य ना स्त्रवे.
स्वीकारता त्या पुण्यरुपा
बंधने तुटती कधी ना.
भूतार्थ आहे मोक्ष हेतु,
त्यास सोडुनि
मार्ग भलता घेतसे
दिव्य-जीवन.
ज्यात उतरे
तोच आहे
मार्ग माझा.
त्याच मार्गी
सश्रध्द मी
तेच माझे ज्ञान की,
चारित्र्य उज्ज्वल
ज्ञान केवळ,
त्या विणा मी

कांही नसे.

: ५४ :

व्यवहार सारा गोड लागे,
शुभ प्रवृत्ती, दान-धर्म,
पूजा-प्रथावना, वाटे हिताची,
परि ज्ञानाविण ते
फोल आहे,
निश्चये.
सिध्द-स्वरुपी चेतनेचे
शिखर मी-
त्या चेतनेचे लक्ष्य माझे
इतर पररुपी नसे-
पररुप सारे भिन्न आहे
माझे तयासी साम्य नाही.
ते जरी बांधे मला
मी तयाचा होत ना.
मल-स्पर्शे वस्त्र होई मलिन,
रासें कमा्रसवे मी अज्ञ की-
मिथ्या संकक्पांचे मेघ सारे
झाकती सूर्या जसे.
मी ही आवृत्त त्यामुळे.
क्रोध, माया, मान सारे
मिळुनी येती मन् मनी,
त्यांच्या मिसे मी
हरवून जाई-

: ५५ :

चिंनी मनाच्या
साभर्थ्य सारे उदित होई,
त्या चिंतनी,
भाव सारे, येती मागे-
भव-स्वरुपी,
जीव रमतो,
ते भाव सारे
जीव होती-
जरी करी, क्रोधदि भावा
क्रोध-रुपे तो परिणमे-
आनंद रुपा जर अनुभवे
आनंदमय तो त्या क्षणी
म्हणुनी कथिले,
भाव सारे त्यागुनी
एक आत्मा की स्मरे.
जरी रमे तू ज्ञान रुपे
ज्ञान भावात्मक
तूच होशी,
आनंद रुपा ध्यान करिशी
आनंद रुपे ध्यान करिशी
आनंद रुपे प्ररिणमे.
चिद्विलासी
रमत असता-

चैतन्य मंदिर
रे तुझे.
भाव सारे सोडुनी तू
एकत्व रुपे,
होतसे.

: ५६ :

सम्यक् विवेकी
जाणतो पररुपता,
पाहतो पररुपता-
त्या सवे तो,
खेळ खेळी
परि न होई तद्रुपता-
मेघ फिरी
विविध रुपे
आकाश सारे
व्यापुनी
परि मेघ तो, मेघ राही
आकाश त्यांना
ना शिवे.
जो स्पर्श, रस
सुखवी मनाला
ते भाव-जल्प तू जाण रे.
ना क्रोध तू,
ना मोह तू
अहंकार ही तू नसे

सृष्टी करी तू भाव रुपे
म्हणूनी वाटे
ते तैसे असे.
भाव-स्त्रष्टा तू अंसा-
विश्व सारे निर्मिशी
त्या भाव-विश्वी
तू स्वत:ला भोगशी
जे भोगतो, वाटे तुला
ते ज्ञय केव्रळ रे असे,
ज्ञेय-भोगी तू निरतंर
त्यात रंगी मानसी.
खेळ सारे, रे मनाचे,
हे सत्य,
उमगे शेवटी,
ज्ञेय सारे सोबती
चिंर प्रवासी तू असे,
त्या प्रवासी
भेटती, बिलगती, भांडती
तू नित्य त्याहुनी वेगळा.
ज्ञानमय ते भाव सारे
तू न गुंते त्या मधी-
सहज मिंळते
ज्ञान म्हणुनी
गुंतसी ज्ञेयात तू.
ज्ञाताच तू
तूच त्याचे ज्ञेय की

तया पलिकउे कांही नसे

ज्ञान विश्वी तू रमे.

जाणता निजपदाला

ते ज्ञानच सार्थक.

झाले कधी ना,

होती कधी ना

ज्ञेय पर ते आपुले,

म्हणुनी जाणी

भाव सारे ज्ञान की,

: ५७ :

हे शुभ,

ते अशुभ,

हे योग्य,

ते अयोग्य,

हे सुंदर

ते अ-सुंदर

भाव सारे त्यागुनी-

हो ज्ञानमय तू

निर्विकल्पी होऊनी

घ्यान परमात्म्याचे करी.

कर्तृत्व-बुध्दी

ही विनाशिक

त्यात तू का रमे?

कर्मफल त्यागूनी सारे

ज्ञानमय तू राही सदा.

उदय होता सूर्य जेसा,
की तमाचे नांव ना,
तैसे स्व-भावा जाणता
मिथ्या तमाचा नाश हो.
फिकिर करता तू तमाची
तमोमय सारे असे,
सोडुनी त्या तपस्वरुपा
ज्ञान-स्वरुपी तू रमे.
ज्ञान-ज्योति तम न जाणे
ती प्रकाशे निज-बळे
तेजस्विता त्या ज्योतिची
कोणी हिरावू ना शके

: ५८ :

जीवात्मा,
तू बध्द, की अ-बध्द
तू मुक्त वा अन्मुक्त
हे सारे विकलप-
त्या विकल्पजालांदून
तू बाहेर तर पड
ज्या विचारांचे
संक्रमण
नित्य होत राहाते,
त्यात तू असणारच कसा-
सर्व विकल्पांच्या स्वामित्वापेक्षा
निर्विकल्प एकात्म स्वरुपाचा

स्वामी कां होत नाहीस?
त्या एकात्म,
विज्ञान-धन-स्वरुप
आनंद-रुपात्मक,
नित्य ज्ञानामृताचे
पान करणाऱ्या-
पूर्ण परिणत आत्मसार स्वरुप
तया परमात्म्याचे
तू दर्शन कां घेत नाहीस?
निज गरिमामय तेजस्वितेने
सहज प्रकाशमान त्या
आत्म ज्योतीत
तू कां उभा राहात नाहीस?
ज्या ज्ञान-अस्त्राची
तळपती धार
कोणत्याही अविवेकान
कसल्याही पक्ष प्रतिपक्षांच्या
आघाताने
कधीही कमी झाली नाही,
त्या ब्रम्ह-मय ज्ञान-अस्त्राचा
तूच स्वामी-
क्षणोक्षणी उद्‌भवणारी
मोहादिकांची राक्षसी रुपे
विदारण करण्यास समर्थ,
अशा त्या ज्ञान-चक्राचे
स्मरण तर कर.

त्या महाप्रतापी ब्रम्हास्त्राचे
वरदान अनादि काळापासून
तुला लाभले,
तरीही तू असा अज्ञ कां?
त्या श्री-वरदांकित,
अचल, अमल, अभेद्य
ज्ञान-चक्राचे ध्यान
म्हणजेच तर तुझी समाधी-
सहज बोधचिन्हित
त्या ज्ञानाचा तू स्वामी.
तरी परंतु
स्वत:ला हीन-दीन-शबल
लेखून,
तू उपास्य देवांची
रांगच रांग उभी केलीस.
त्या देव-देवतांच्या
भजनात
पूजेत
प्रार्थनेत
अनमोल ज्ञान-क्षण
चित्-क्षण, आनंद-क्षण
तू वेचित आलास.
काल ज्याला बांधू शकला नाही,
क्षेत्रज्ञ तू असता,
तया क्षेत्ररुप संधीची,
पराक्रमाची, काल-द्रव्यलब्धीची

वाट पाहात बसलास.

ते सारे परात्म

ते तुला काय सहाय्य

करणार?

तूच तर महाक्षेत्रज्ञ,

कालज्ञ, द्रव्यज्ञ आणि

भावज्ञ-

कुंडली मांडित बसून

त्या सर्व पर-सापेक्ष

संधीची आराधना-कशासाठी?

कुंडलीत असलेले

ते सारे ग्रह, विग्रह

भूत-पिशाच्चादिक सारे-

चंद्र-सूर्य-राहु-केतु

ते सारे तुझ्या-

परसाच्या बागेतील

फुलपाखरे

त्यांचे तुला काय भय?

: ५९ :

भ्या कुल मन,

संत्रस्त, पीडित

ताण-तणाव युक्त तुझे मन.

विविध विकारांच्या मधमाशांचे

ते मोहोळ.

त्या मनालही निर्मन

निर्मळ, अस्तित्वहीन
करुन टाकण्याची तुझी शक्ती.
त्या सतत चपळ, अस्थिर
अनावर मनाच्या
विचार-विकलपांचे
ओझे घेऊन
स्वत:ला कां संत्रस्त
करुन घेत आहेस?
ज्ञान-वहनी चेतना
कोठे जातील ते विकलप-संकल्प,
अग्नीपुढे कापसांचे
सहस्त्रावधी ढिगारे-
त्यांची काय तमा-
शुध्द, निराकुल, अबध्द,
योगी तू-
त्या नियोगाचा याग-
यज्ञ तू कां चेतवीत नाहीस?
त्या अग्नीत,
ज्ञाताज्ञेय
ध्याता-ध्येय
धर्म-धर्म्य
यांची राखच
होऊन जाईल.
द्वैत हे सत्य-
व्यवहारा पुरते-
जणु बुडबुडे-

जलाशयावरील.

सोड त्या द्वैत-रुप

विचार-संकलपना-

स्वस्मिन् स्वयं पश्यसि

आपलयाच ज्ञान-जलाशयांत

आपलेच रुप-

ते प्रसन्न, ज्ञान-भाव रुप

तजस्वी रुप.

तेथे कोणी ज्ञाता नाही

ज्ञान नाही, ज्ञेय नाही-

केवळ एक महा अस्तित्व

स्वतःचे.

: ६० :

ज्ञेय पदार्थांची

अनंतानंत

अवस्थांतरें,

वर्त-भूत-भूविष्य काळातील देखील

सारी विसावती तुझ्या

एका क्षणमात्र ज्ञानरुपात-

त्या अखंड ज्ञानसत्तेत

कुणी खंड-खंड

कुणी अंश-अंश

सारे विश्रामती

सुखेनैव

तू पिवून टाकतोस

त्या त्यांच्या

क्षणजीवी सत्ता

आणि तुझी ती अविनाशी

अखंड सत्ता,

सव्रंना आपल्या विशाल

ऊँकार रुपात सामावून घेते-

मग त्या ऊँकार-रुपांत

भेद संकल्पना, अंश संकल्पना

भावाभावा संकल्पना

पूर्णतः विरुन जातात.

सर्व चित्र-विचित्र रुप

कार्य-काणांच्या श्रेणी

कर्ता-कर्म-कारकांच्या

आतिषबाजी-

सारे संपूनच जाते.

: ६१ :

समग्र सीमा तटांची

तटबंदी-

की ज्यामुळे सारेच

दुर्गम, दुर्बोध, दुर्दम्य

वाटत होते-

ती तुटून पडली-

धराशायी-

ज्ञानाच्या अशा तीव्रतर

आघातामुळे-

वंश, जात-पात-धर्म
देश, रंग, त्तवज्ञान
त्या साऱ्यांचा ध्वंस
एका ज्ञान वातचक्रमुळे.
किती काळ ठेवणार आहात
ते गुलामीचे, अज्ञानाचे
दुर्ग सांभाळून-
आणि तया दुर्गांत स्वत:च्या
ज्ञानमय आत्म्याला
बंदिस्त करुन-
तया हृदयस्थ
परमात्म्याची हांक
ऐकू कशी येत नाही-?
तो सदैव साद घालीत
आहे तुम्हाला
पण इंद्रियसुखांच्या
परम-समाधीत
तुम्ही आपले कान
बंद करुन घेतलेत